
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# ''स्थानिक स्वराज्य संस्था – एक चिकीत्सक अभ्यास ''

श्री. शिवराज कल्याणराव लाखे
संशोधक विद्यार्थी

## सारांश

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात लोकशाही शासनपध्दतीचा स्विकार केला गेला. त्या नंतरच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्व प्राप्त झालेले दिसून येते.केंद्रसरकार,घटक राज्य आणि स्थानिक शासन अशा तीन स्तरावर भारतातील शासन व्यवस्थेचा कारभार चालविला जातो. केंद्र शासन देशहिताचा विचार करुन वेगवेगळया धोरणाची आखणी करते तर राज्य शासन अशा धोरणाची स्थानिक शासना मार्फत अंमलबजावणी करुन प्रशासन यशस्वी बनवणे गरजेचे असते. जनतेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी केंद्र शासनाला निर्णय घेवून विविध उपाय योजना कराव्या लागतात.अशा समस्या सुटणे हे नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक असते.



स्थानिक शासनाच्या मदतीने या समस्या सोडविल्या जातात. कारण स्थानिक पातळीवर लोकांना विश्वासात घेवून काम करीत असते.तसेच स्थानिक शासनाच्या मदतीने या समस्या सोडविल्या जातात. तसेच या शासन व्यवस्थेचा दैनंदिन व्यवहारात सामान्य जनतेशी प्रत्यक्ष –अप्रत्यक्ष संबंध येत असतो. आर्थीक,सामाजिक,शैक्षणिक विकासाबाबत केंद्र व राज्य सरकार या स्थानिक स्वराज्य संस्थावरच अवलंबून असते.लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण,आर्थीक,सामाजिक,राजकीय समता आणि न्याय प्रस्थापनेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिवसेंदिवस महत्व प्राप्त होत असलेले दिसून येते.स्थानिक स्वराज्य संस्था या शासनाच्या कायदयानुसार निर्माण झाल्या असून त्याचा कारभार हा खेडयातील किंवा शहरातील लोकप्रतिनिधीच्या मार्फत पाहिला जातो.व त्याच्यासाठी निर्माण केलेल्या कायदयानुसार चालतो.

स्थानिक स्वराज्य संस्था या सत्तेच्या विकेंद्रिकरणाच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या असून स्थानिक लोकांना स्थानिक प्रश्नांची चांगली जाणीव असते त्या समस्या सोडविण्यासाठी त्याचा सहभाग महत्वाचा असतो.

## शोध निबंध विषयाची उद्दिष्टये

१.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वरुपाचा आढावा घेणे.
२.स्थानिक स्वराज्य संस्थाचे महत्व या भूमिकेचा अभ्यास करणे.

## शोध निबंध विषयाची व्याप्ती

१.प्रस्तुत संशोधनात जालना शहराचा समावेश करण्यात आला आहे.
२.प्रस्तुत संशोधनात स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्वरुप व महत्व या भूमिकेचा अभ्यास करण्यात आला आहे.

## शोध निबंध संशोधन पध्दतीची निवड :

प्रस्तुत संशोधनात विषया करीता सर्वेक्षण संशोधन पध्दती वापरण्यात आली आहे.

## प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले न्यादर्श :

प्रस्तुत संशोधनाची कार्यपध्दती ठरविण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आली त्यासाठी नमुना निवड सुगम यादुच्छिक पध्दतीचा अवलंब करुन जालना शहरातील 50 नागरिकांची निवड करण्यात आली होती.

## संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनात निरीक्षण व प्रश्नावली व अभ्यास करण्यासाठी तथ्य संकलनाकरीता प्राथमिक व दुय्यम संशोधन साधनांचा अवलंब करण्यात आला आहे. प्रसिध्द ग्रंथालयाचा उपयोग करुन संशोधकाने प्रसिध्द,तज्ञ व्यक्तीच्या पुस्तकांचा आढावा घेतला आहे. संबंधित पुस्तकांचा आढावा व अभ्यास करण्यात आला आहे.

## निष्कर्ष

१.स्थानिक शासन व्यवस्थेच्या अंतर्गत महानगरपालिका,नगरपालिका,जिल्हा परिषद,तालुका पंचायत,ग्रामपंचायत या सर्व शासन व्यवस्थेचा अंतर्भाव होत असतो.
२.स्थानिक स्वराज्य संस्था ही स्थानिक काम करणारी यंत्रणा असते.प्रत्येक नागरिकांचा जन्मापासुन ते मृत्युपर्यंत या शासन व्यवस्थेशी दैनंदिन संबंध येत असतो.
३.स्थानिक स्वराज्य संस्था या राज्य शासनाच्या कायदयाद्वारे निर्माण होतात. स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्याचा व त्यांचे भवितव्य ठरवण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे.
४.स्थानिक स्वराज्य संस्थांकडे कायदे विषयक सत्ता असते. ही सत्ता राज्य शासनाने प्रदान केलेली असते.राज्य शासनाने स्थानिक शासन व्यवस्थेबाबत अधिनियमाची चौकट निर्माण करुन दिलेली असते.
५.राज्य शासन स्थानिक शासनाच्या मदतीने लोक कल्याणाची जबाबदारी पार पाडीत असते. लोककल्याणकारी योजनांसाठी केंद्रसरकार राज्य सरकारला अनुदान देत असते व राज्य शासन स्थानिक शासनाला अनुदान देत असते.
६.विकसीत लोकशाहीवादी देशाचा विचार करीत असतांना असे आढळते की, तेथील स्थानिक स्वशासन व्यवस्थेने लोकशाही टिकविण्यास मोठा हातभार लावलेला आहे.
७.स्थानिक शासन व्यवस्थेकडे राजकीय शिक्षणाची पाठशाळा म्हणून पाहिले जाते. लोकशाहीत लोकांचे सहकार्य व सहभाग, लोकांची संमती,सहिष्णुता अशा गुणांच्या आधारे लोकशाही शासनव्यवस्था स्थिर होत असते.
८.स्थानिक पातळीवर जर लोक कल्याणकारी योजनांना यश आले तर राज्या पातळी व राष्ट्रीय पातळीवरही केंद्र शासन लोक कल्याणकारी योजना राबवित असते.
९.लोकशाहीच्या उज्वल भवितव्यसाठी राज्यातील नागरिकांना स्वातंत्र्याचे मोल व महत्व समजवणे आवश्यक असते ते रुजवण्याचे महत्वाचे कार्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे पार पाडले जाते.

## संदर्भ ग्रंथ सूची

१.पळशीकर सुहास,२००३,''परिवर्तनाच्या राजकारणापुढील पेच ,''पुणे,भाई वैदय अमृत महोत्सव गौरव समिती.
२.फडके य.दी,१९९९''विसाव्या शतकातील महाराष्ट्र,खंड १ ते ५,''पुणे श्री.विदया प्रकाशन.
३.फडके य.दि.,१९८२''राजकारणाचे बदलते रंगरुप ,''पुणे,कॉन्टिमेंटल प्रकाशन.
४.थोरात सी.पी.२००५,''कांशीराम :मुनवादापुढील आव्हान,''पुणे,शिवम प्रकाशन.
५.लेले जयंत,१९९०,'' विधानसथा निवडणुक आणि मराठयांचे धुरीणत्व,''पुणे,समाज प्रबोधन प्रत्रिका.
६.व्होरा राजेंद्र,१९९६,'' सत्तेचे बदलते आधार,''पुणे,अनुभव मासिक,मे
७.सरवटे दिलीप व विरगुडकर (२००९)''निवडणुक सर्वकाही,''राजहंस प्रकाशन,पुणे,आवृत्ती पहिली.